# बाह्यरंग ते अंतरंग
# ठाणे वेध
# ११,१२,१३ डिसेम्बर २०१५

**- एक झलक – धनश्री केतकर**

ठाण्याचे नागरिक उत्सुकतेने ज्याकडे वर्षभर डोळे लावून बसतात त्या वेधचा दिवस उजाडला. अचानक मळभ दाटून आले होते . मागच्या वर्षीप्रमाणे परत पाऊस पडेल की काय अशी धाकधूक होती. पण वेधचे तिन्ही दिवस सुरळीत व नेहमीच्या जल्लोषात पार पडले. **डॉ. आनंद नाडकर्णी** यांचे खुमासदार व नेमके सूत्रसंचालन कार्यक्रमाची रंगत वाढवत होते. त्यांना **दीपिका दाबके** व **रवींद्र मांजरेकर** यांची समर्थ साथ होती. वेध वाद्यवृंदातील वेदांत या छोट्या तबलजीमुळे गीतांची लज्जत वाढली होती.

यावर्षीच्या **बीजभाषणाऐवजी सुप्रसिध्द समाजसेवक,चित्रकार,लेखक- अनिल अवचट यांनी मुक्तचिंतन केले.** ते म्हणाले टिकाऊपणातून दिखाऊपणा कडे आपली वाटचाल झाली आहे.
आपण आपल्या व्यक्तिमत्वावर एक आवरण चढवून वावरतो.
यासाठी त्यांनी कबीराचा एक दोहा सांगितला –
त्वचा बाहरीको कितना सजाते
वो गहने,वो कपडे वो इत्तर फुहारे
अंदर छीपाये मन गन्दगीको
ले हाथ झाडू कर साफ सुथरे
झाडाचे खोड बाहेरून खडबडीत असले तरी आतून जीवनदायी रसवाहीन्या असतात. टणक टरफल व आतले मऊ दोन्हीचा उपयोग आहे. बाह्यरंग व अंतरंग परस्पर पूरक असतात. महत्व बाहेरच्या रंगाला, कपड्यांना नसून आतल्या व्यक्तीला आहे.
जंगलातही परस्पर सहकार्य असते. स्वतःचा जीव धोक्यात घालून माकडं ओरडून वाघाची वर्दी इतर प्राण्यांना देतात. माणसांमधली युद्धे, दंगली ही लाजिरवाणी गोष्ट आहे. न्युयोर्क स्टेशन वर रक्तबंबाळ होऊन पडलेल्या बाईला कोणीच मदत करत नव्हते. दुसऱ्याचे दुःख बघून मन कळवळले पाहिजे. सिग्नलवर भीक मागणाऱ्या मुलांमध्ये त्यांना आपल्या मुलींचे चेहरे दिसतात व वाईट वाटते. माणसांची संवेदनशीलता कमी होते आहे. असेच जर आपण मी मी करत राहिलो तर आताचे नष्ट होणारे डायनासोर आपण असू. न मागता केलेली मदत ही तर जास्तच सुसंस्कृत असते. खरेखुरे वागायला शिकू या, सगळ्यांसह जगायला शिकू या. आपल्या छानछोकीसाठी आपण निसर्गाचा संहार करतो आहोत पण **जेव्हा ते शेवटचं झाड तोडतील तेव्हाच त्यांना कळेल की पैसा हे अन्न होऊ शकत नाही.**
**स्वतःला शोधा**, तुम्ही काय गोष्ट विनासायास, आवडीने करू शकता? आपला कल शोधण्याची संधी प्रत्येकाला मिळायला हवी तेच खरे स्वातंत्र्य !

**वेधचा दुसरा पाहुणा हा खरतर IPH चा घरचाच - 'आवाहन' टीमचा सचिन गावकर !**

सचिनचा पहिला सायकल प्रवास होता ठाणे ते डोंबिवली हे २१ किमीचे अंतर. त्यानंतर हळूहळू मनाली ते खारदुंगला, डोंबिवली-कन्याकुमारी (१७०० किमी), अरुणाचल, मिझोराम असे अनेक प्रवास केले. नंतर त्याने याहून अधिक काहीतरी करण्याचे ठरवले. IPH ला पंचवीस वर्षे पूर्ण होत आहेत त्यानिमित्त पंचवीस राज्यांचे सायकलवरून भारतभ्रमण व मानसिक आरोग्याविषयी जनजागृती करण्याचे त्याने ठरवले. त्या सर्व प्रवासाची दृक्श्राव्य नोंद करून पुढे त्यावर पुस्तकही लिहायचे ठरले. प्रवासाचा मार्ग ठरवण्यासाठी त्याने सहा महिने अथक परिश्रम घेतले. सचिनला अस्थमा, spondilitis असे अनेक त्रास आहेत म्हणून शारीरिक व मानसिक दृष्ट्याही बरीच तयारी केली. डोंबिवलीहून रोज सायकल चालवत ठाणे व सायकल उचलून अकरा मजले IPH च्या ऑफिस पर्यंत चढणे असा सराव केला.
सचिनने ३० किलो सामानासह एकूण तेरा हजार किमी. प्रवास २२३ दिवसात केला. अनेकविध अनुभव आले. तामिळनाडुमध्ये खूप उलटा वारा वहात होता, सिक्कीमला १३१ फूट उंच बुध्दमूर्ती बघितली, १७५८२ फुटांवरील तान्ग्लांग्ला पास वर चढाई केली, शान्तिनिकेतनच्या होळीला खूप खडतर प्रवास करून पोचला, बांबूच्या पुलापासून, वाहून गेलेल्या रस्त्यांपर्यंत अनेक मार्गांवरून गेला. रतन थिय्याम हे नाट्यगुरू, त्रिपुरामधील SP अभिजित सप्तर्षी, लेह्चे सोनम वांगचुक (३ idiots मधल्या शाळेचे), १८ हजार किमी. चालत आलेले बल्गेरिअन जोडपे , २२ हजार किमी सायकल चालवत व cancer awareness निर्माण करत सतरा देश फिरून आलेला Graham अशी अनेकानेक माणसं भेटली.सिक्कीमच्या राजभवनापासून welding workshop पर्यंत निरनिराळ्या ठिकाणी राहायला मिळाले. रस्त्यावरच्या कलिंगडवाल्यापासून मोठ्या कॉलेजपर्यंत ठिकठीकाणी मानसिक आरोग्याविषयी सांगण्याची संधी मिळाली. तामिळनाडुतल्या सृष्टी व्हिलेजपासून ओरिसातील जनमंगल पर्यंत अनेक संस्था पहाता आल्या.
या सर्वात आपल्याला सचिनची परीपूर्ण आखणी तरीही योग्य वेळी दाखवलेली विचारांची लवचिकता, त्याची जिज्ञासु, साहसी वृत्ती, माणुसकी या सर्वांचे दर्शन होते.
सचिनची अंतर्यात्रा हा अंतरंगापासून बाह्यरंगाकडे आणि परत अंतरंगाकडे असा प्रवास होता जणू !

**दुसऱ्या दिवसाची सुरवात अश्विनी जोशी** या **ठाण्याच्या जिल्हाधिकारींनी** केली.

कोकणात बालपण गेलेल्या अश्विनी या मुंबईला राहून dentist झाल्या. वसतिगृहात राहिल्यामुळे त्या खूपच independent झाल्या. BDS मध्ये फारसा रस नसल्याने internship दरम्यान त्यांनी UPSC चा अभ्यास सुरु केला.त्यांनी समाजशास्त्र आणि मराठी विषय घेतले होते. रोज आठ दहा तास अभ्यास, तासभर वृत्तपत्रवाचन व ३ तास dentist म्हणून काम असा त्यांचा दिनक्रम होता. तिसऱ्या प्रयत्नात त्यांची निवड झाली. मसुरीच्या प्रशिक्षणामध्ये देशभरातील विविध माणसांशी जुळवून घेण्याची सवय होते व एक छानसे network तयार होते. ३ छोटे ट्रेक व एक मोठा ट्रेक असतो. पुस्तकी शिक्षणही खूप असते.

दोन महिने भारत दर्शन होते यात आर्मी कॅम्पपासून नक्षलग्रस्त भागापर्यंत आणि मोठ्या कंपनी पासून तिरुपती मंदिरापर्यंत सगळीकडचे अनुभव देतात.

त्या म्हणतात बौद्धिक पातळीवरही कोणतीच तडजोड न करणं हे कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याचे काम आहे. **मी चुकीचे वागणार नाही व दुसऱ्यालाही वागू देणार नाही** असा बाणा हवा. त्यांच्या आठ वर्षात सात बदल्या झाल्या पण **बदली ही आपत्ती नसून संधी आहे** असे त्या मानतात. रेशनिंग विभागात असताना त्यांनी धाडी टाकून आठशे कोटींचा माल जप्त केला. अनेक वर्षे रखडलेल्या साडेचारशे बढत्या दिल्या व निराश सहकार्यांमध्ये चैतन्य निर्माण केले.

अकोल्याला आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या घरातील स्त्रीयांना अंगणवाडी सेविकेची नोकरी द्यायची होती. यातील अडथळे ओलांडून बहात्तर महिलांना अशी नियुक्ती दिली. त्यापैकी एकजण म्हणाली "पैशाने सर्व होत नाही, तुम्ही आम्हाला बळ दिले."

अश्विनी यांनी सहा वर्षांपूर्वी अकोल्यातील दहा शाळात sanitary napkin vending machines बसवली व तीन बचत गटांना ती refill करण्याचे काम दिले. कामावर टीका झाली तरी न डगमगता त्यांनी सत्याची कास सोडली नाही. **Lead from the front**, हा त्यांचा motto आहे. शेवटी त्यांनी सांगितले की '**Give chance to your child to do what he wants'**

**चाळीसगाव येथील सर्पमित्र व सर्पतज्ञ : राजेश ठोंबरे**

आजवर यांनी तीस हजार लोकांचे जीव वाचवले आहेत. आज ते एक honorary forest officer आहेत.

लहानपणी आजी कपडे धुवायला जायची तेव्हा पाण्याजवळ बसून मासे पकडायचे व त्यांचे निरीक्षण करायची आवड लागली.आजी तांदूळ निवडताना राजेश त्यातले अळ्या, किडे बघत रहात. आजोबांना दान म्हणून मिळालेल्या मारकुट्या गाई याला एकट्याला हात लावू देत. वेदशास्त्री संपन्न आजोबा याने मासे पकडत बसू नये म्हणून स्तोत्र पाठ करायला बसवत, पण पटापट पाठांतर करून हा आपल्या उद्योगांना पळत असे. एकदा चुकून मासा म्हणून पाणसाप पकडला तेव्हा पहिल्यांदाच आजीचा मार खावा लागला. मात्र कुतूहल आणखी वाढून पाणसापांचेच निरीक्षण सुरु झाले. हळूहळू गावातले लोक साप पकडायला बोलावू लागले. राजेशने गारुड्यांकडून सापांची माहिती मिळवली. प्राण्यांच्या जवळ जाण्यासाठी तेल, साबण न लावता, कपडे मातीत बुचकळून घातले की प्राणी, पक्षी जवळ येऊ देतात असे आदिवासींकडून शिकायला मिळाले. तुकारामबुवा सारखे आदिवासी माकडांचे निरीक्षण करून औषधांचे ज्ञान मिळवतात. त्याला असे आढळले की सर्वसामान्य लोक माहितीअभावी सापाकडे भीतीने किंवा भक्तीने बघतात. सगळेच साप चावत नाहीत, हे त्याने लोकांना प्रत्यक्ष बिनविषारी साप हाताळायला देऊन पटवून द्यायला सुरवात केली. तसेच अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे कार्य करायलाही सुरुवात केली. असेच एकदा मोटरसायकलवरून नेलेला व खूप धक्के खाऊन संतापलेला नाग चवताळला आणि चावला. राजेश स्वतः सायकलवरून डॉक्टरकडे गेला त्यामुळे त्यांचा विश्वासच बसेना . त्यांनी नर्सला बोटाची जखम बघायला सांगितले.

नर्सने बोटाची पट्टी सोडताच नागाचे विष अंगात भिनले आणि याला मृत्यू आला आहे असे डॉक्टर म्हणाले. रात्री पोस्टमोर्टेम होणे शक्य नव्हते म्हणून प्रेत तसेच पडले होते. सगळा गाव बघायला लोटला. डॉ. पूर्णपात्रे यांना शंका आली की याचा मेंदू तर चालू नसेल? बऱ्याच प्रयत्नांती रात्री साडेबारा वाजता हृदय चालू झाले. पुनर्जन्मच झाला जणू !

यानंतर आजी पुन्हा साप पकडू द्यायला तयार नव्हती पण तिला पटवून दिले की आता माझे आयुष्य म्हणजे मला मिळालेला बोनस आहे. प्रथमोपचार प्रशिक्षण, सापांविषयी कृतीशील प्रबोधन आणि साप पकडून त्यांना व लोकांना वाचवण्याचे कार्य अशा तऱ्हेने त्यांचे काम चालू आहे. लोकांकडून पैसे जमवून दोन ICU माणसांसाठी व एक प्राण्यासाठी केला आहे. आजवर यांच्या विनंतीवरून गरजू लोकांना जवळजवळ दोन कोटी रुपयांच्या treatment निरनिराळ्या राजेशच्या सहकारी डॉक्टरांनी फुकट दिल्या आहेत.

त्यांच्या घरी चौदा कुत्रे व साप वगैरे आहेत. त्यांच्या कामात कुटुंबाचेही सहकार्य असते.

ते म्हणाले सर्पदंशाचा प्रश्न, शेतकरी आत्महत्ये एवढाच किंवा त्याहूनही जास्तच महत्वाचा आहे. दरवर्षी अडीच लाख सर्पदंश होतात त्यात पन्नास हजार लोक मरतात. मेडीकलच्या अभ्यासक्रमात सर्पदंशावर फक्त दीड पान आहे. स्थानिक सापांवर स्थानिक औषधे हवीत. यात भरपूर संशोधन होण्याची गरज आहे. औषधे महाग तर असतातच पण उपलब्धही नसतात. ते म्हणाले **संघर्ष करण्याची ताकद माझ्यात नाही पण मी सहभाग देऊ शकतो व तो मी देतो.**

**Elephant design - अश्विनी देशपांडे**

यांनी आपल्या क्षेत्रात शंभरहून जास्त बक्षिसे मिळवली आहेत २० हून जास्त देशात व्याख्याने दिली आहेत ,२००८ कॉमनवेल्थ युथ गेमचे design केले आहे. बारावीनंतर NID (national institute of Design) इथे शिक्षण घेतले. तिथे भारतभरातून फक्त २४ जणाना निवडतात. तिथली वैशिष्ठे म्हणजे – शिकवणे, परीक्षा, मार्क, तुलना हे सर्व वर्ज्य ! मात्र शिकायला शिकणे (self study) व स्वतःशीच स्पर्धा करणे .

त्या काळात त्यांच्या योग्य नोकऱ्या नव्हत्या म्हणून सहा मित्र मैत्रिणींनी मिळून कंपनी सुरु केली. आंधळ्याच्या गोष्टीत प्रत्येकाला हत्ती वेगळाच भासतो. या वरून त्यांनी आपल्या कंपनीचे नाव ठेवले 'Elephant Design' जगातल्या सगळ्यात मोठ्या design कंपनीत पाचशे लोक आहेत तर इथेही ऐंशी लोक आहेत.

उत्तम डिझाईन म्हणजे काय तर – साधे, उपयुक्त .समजायला सोपे , वापरायला सोपे, सुरक्षित, काळजी घ्यायला सोपे ,आकर्षक, हवेहवेसे. त्याशिवाय ते परवडणारे असावे व आनंददायक असावे. डिझाईन करताना ते कोणासाठी,कशासाठी, का व कसे आणि ते नाविन्यपूर्ण आहे का याचा विचार केला जातो.

त्यांच्यामते –

चांगले डिझाईन = लंडन अंडरग्राउंड रेल्वेचा नकाशा व इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशीन

वाईट डिझाईन = ज्येष्ठांच्या वापराच्या दृष्टीने सध्याच्या फोनचे डिझाईन

निसर्गातले आवडते डिझाईन – झाडाचे पान
उत्कृष्ठ डिझाईन देव – गणपती
त्यांना एका जागतिक प्रकल्प ‘Colors Of Asia’ चा भाग होण्याची संधी मिळाली. यामधे तेरा देशातील लोक एकत्र येऊन आशियाची सांस्कृतिक ओळख शोधण्याचा प्रयत्न केला. सर्व संस्कृतीतले समान काय, वेगळे काय, नैसर्गिक व अनैसर्गिक काय याचा शोध घेतला गेला.
थोडक्या वेळात स्लाईडसच्या सहाय्याने त्यांनी या विषयाची खूप माहिती दिली.

**श्रीकांत परांजपे – बांधकाम व्यावसायिक**

CA चे शिक्षण घेऊनही त्यांनी आजोबा व काकांप्रमाणेच बांधकाम व्यवसाय करायचे ठरवले. आजोबांनी पार्ल्यात जमिनी विकत घेऊन घरे, शाळा काढली, काकांनी हौसिंग सोसायटी तयार केली. श्रीकांत यांनी इतर अनेक गृहप्रकल्पांबरोबर ‘अथश्री’ हे ज्येष्ठ नागरिक संकुल निर्माण केले. त्यांनी भारतातील सर्वात जास्त senior citizen housing निर्माण केले व परदेशातही करणार आहेत. पैशाचे पाठबळ असणारे ज्येष्ठ येथे निश्चिंतपणे व आनंदाने राहू शकतात.
ते म्हणतात मी आज माझ्या दहा हजार ग्राहकांचा विश्वस्त आहे. ज्या घरासाठी आम्ही दोन वर्षे काम करतो त्यासाठी ग्राहक २० वर्षे कष्टत असतो. म्हणून व्यवसायाशी १००% बांधिलकी असल्याचे ते मानतात. तणावनियोजनासाठी ते म्हणतात **मला कधीच राग येत नाही कारण दुसऱ्याचीही काही बाजू असतेच.** कोणत्याही निर्णयांच्या सकारात्मक बाबीवरच ते भर देतात. इतकच नव्हे तर **चूक कबुल करणाऱ्याचा ते सत्कार करतात.** कारण चूक मान्य करण्यासाठी धैर्य लागते.
**दुसऱ्याची नोकरी करण्यापेक्षा दुसऱ्याला नोकरी द्या, उद्योजक बना** असा संदेश ते देतात.

**रेणू गावस्कर – देहविक्रय करणाऱ्या स्त्रियांच्या मुलांसाठी पाळणाघर, शाळा.**

रेणूताईंचे हळुवार पण तितक्याच ठाम आवाजातील बोलणे मनाला अगदी भिडत होते. त्या बारा वर्षाच्या असताना त्यांच्या आईला parkinson हा असाध्य आजार झाला व त्यांच्या पंचविशीत मृत्यूही झाला. लग्नानंतर त्यांच्या पतीने त्यांना सांगितले की पैशासाठी एकानेच काम करायचे व एकाने समाजासाठी! संध्याकाळी फिरायला जाताना ‘डेव्हिड ससून रिमांड होम’ मधली गजामागची कोवळी मुले पाहून रेणूताईना फार वाईट वाटायचे. मग त्यांनी तिथे जायला सुरवात केली. सुरवातीला खूप दुःख वाटायचे. एकदा एका मुलाने नाव सांगितले राजू N.N.K. म्हणजे नेम नॉट नोन . त्यानंतर तिथल्या अनेक मुलांनी रेणूताईंचे गावस्कर हे आडनाव घेतले. मुलांनी त्यांच्या बद्दल सांगण्याच्या माहितीत व फाईलमधे असलेल्या माहितीत फरक असायचा. पण त्या म्हणतात समोरची व्यक्ती खरच सांगेल असा विश्वास ठेवला की ती कधी ना कधी खरे सांगतेच.
पुढे विजयाताई लवाटें बरोबर जाऊन वेश्यावस्तीतील स्त्रिया व मुले यांच्याशी संवाद साधायला सुरवात केली. त्या जगापलीकडे या मुलांना जगच माहीत नसतं. मनात साठून राहिलेली अस्वस्थता, राग व्यक्त करण्यासाठी ही मुलं बरेचदा खूप हिंस्त्र वागतात, मारतात, चावतात.

त्यांच्याशी प्रेमाने बोलले तर त्यांना खूप आनंद होतो. या मुलांसाठी त्यांच्या अवतीभवतीच्या वातावरणापेक्षा वेगळी पण घरसदृश्य व्यवस्था निर्माण करायची ठरवले. पंधरा वर्षापूर्वी 'एकलव्य' ला सुरवात झाली. एकेठिकाणी रस्त्यावर राहणारी ऐंशी मुले व दुसरीकडे वेश्यावस्तीतील ऐंशी मुलांची सोय केली आहे. ती जास्तीतजास्त वेळ व गरज असेल तर पूर्ण वेळ तिथे असतात. **पुढे काय या विचाराने दुःखी किंवा चिंतीत होण्यापेक्षा ते मूल आत्ता आनंदात आहे या विचाराने त्यांना आनंद वाटतो.** त्या स्वतःलाच सांगतात '**Don't worry ,everything will be all right.**' त्यांना शिक्षण म्हणजे मुलांच्या मनाला दिलेला हळुवार झोका वाटतो.

**गांधीजींची ही शिकवण** त्यांना फार महत्वाची वाटते **'श्रध्दा होना एक के लिये एक'** म्हणजे **प्रत्येकाने निदान एकासाठी तरी काहीतरी करावे**.

अजूनही **गिर्यारोहण करणारे ९६ वर्षाचे आबा महाजन**

त्यांनी ८८ व्या वर्षी parasailing केले. तर ९१ व्या वर्षी लोणावळा येथील dukes nose ते dutches pinacle या दरम्यान rappelling केले. खोल दरी बघून भीती नाही का वाटली असे विचारल्यावर ते मजेत म्हणाले. खरं तर थोड्या वेळाने वाटायला लागले की अजून कसे पोचलो नाही ? मग मनाशी 'ग्यानबा तुकाराम' म्हणत त्या ठेक्यावर वाटचाल चालू ठेवली. हे सर्व कुठलेही विक्रम करण्यासाठी नाही तर केवळ तरुणांना त्यापासून स्फूर्ती मिळावी म्हणून.

त्यांचा दिनक्रम ठरलेला असतो.सकाळी ३.३० वाजता उठून पंधरा मिनिटे चिंतन व पंधरा मिनिटे व्यायाम. चार वाजता बाहेर पडून दहा किमी. चालणे. त्यानंतर चहा घेऊन, स्नान, पूजा व वर्तमानपत्रातील क्रिकेट सोडून इतर खेळांच्या बातम्यांचे वाचन, त्यानंतर शाळा, Redcross अशा एखाद्या कामाच्या ठिकाणी जाऊन येणे, त्यानंतर चौरस जेवण व रात्री साडेआठला झोप. दर गुरुवार व रविवार ते सिंहगड चढून जातात.

त्यांना चालण्याची आवड कशी निर्माण झाली याबद्दल ते सांगतात की लहानपणी गाई, म्हशी चरायला नेण्यासाठी भरपूर चालणे व्हायचे. तसेच शाळेत scout मधे Minimum needs and maximum adjustment (कमीतकमी गरजा आणि जास्तीतजास्त तडजोड) हे तत्व शिकायला मिळाले.

साठ सालापासून २०१४ पर्यंत ते हिमालयात जात आहेत. त्यांचे सगळ्यांना सांगणे आहे

**घटका गेली पळे गेली , तास वाजे ठणाणा**

**आयुष्याचा नाश होतो ,एकदातरी गड चढाना**.

चांगल्या आरोग्यासाठी ते सांगतात -१) लौकर उठा, लौकर निजा

२) वक्तशीर वागा

३) रोज व्यायाम करा

४) वेळेवर जेवा

५) हसतमुख रहा.

वयाच्या शंभराव्या वर्षी किन्नर कैलास हे पंच कैलासापैकी पाचवे शिखर चढून जाण्याची त्यांची इच्छा आहे , कारण उरलेली चार शिखरे आधीच झाली आहेत.
खरंतर **शिखराला पोचण्यापेक्षा प्रवासात जास्त मजा आहे** असे ते म्हणतात.
त्यांनी असही सांगितलं की मनाने परिपक्व व्हा पण कृतीला वयाच बंधन नाही.
**वयोवृध्द व्हा पण मनोवृध्द होऊ नका !**

**निसर्गविज्ञान क्षेत्रातील OIKOS च्या – केतकी घाटे आणि मानसी करंदीकर**

दोघींनाही या विषयाची आवड असल्याने त्यांनी प्रकाश गोळे यांचा ecological society चा डिप्लोमा कोर्स केला. त्यानंतर एका ओसाड अर्धा एकर जागेवर हिरवाई फुलवली. यातून प्रेरणा मिळून दोघींनी कंपनी स्थापन केली. (OIKOS) त्यांच्या कार्यालयातील फर्निचर टाकाऊ वस्तूंपासून केलेलं आहे. जमीन नियोजन, संवर्धन याचे साठहून अधिक प्रकल्प तर ecological survey करण्याचे १०० हून अधिक प्रकल्प त्यांनी केले आहेत.
जमिनीचा सर्व्हे करताना तेथील पक्षी, प्राणी, कीटक, साप या सगळ्याची नोंद करतात. त्याचे कारण म्हणून त्यांनी एक उदाहरण सांगितले. ज्या वर्षी प्राणीशास्त्र हा विषय सुरु झाला व त्यात बेडकाचे विच्छेदन शिकवायला सुरवात झाली तेव्हा राज्यातले भाताचे उत्पादन घटलं कारण बेडूक पकडले गेल्यामुळे किडींनी (बेडकाचे अन्न) खुपसा भात फस्त केला !
पर्यावरणीय पुनरुज्जीवन करण्यासाठी बांध घालणे वगैरे सल्ला देणे व त्याची अंमलबजावणी करणे, ecological landscaping करून देणे ही देखील त्यांची कामे आहेत. लॉनला पाणी जास्त लागते, त्यामुळे ते कमीतकमी लावतात. हिरवाई बरोबर पक्षी, फुलपाखरही येतील याचा विचार केला जातो. बाएफ संस्थेसोबत काही देवरायांच्या पुनरुज्जीवनाचे काम चालू आहे. पारंपारिक ज्ञानाचे संकलन चालू आहे. यात शेती, बांधकाम, मासेमारी, वाद्ये, स्वैपाकाची साधने असे सर्व विषय आहेत.
निसर्गात काम करण्यासाठी बाह्यरंगही निसर्गासारखा हवा हे त्या पाळतात. त्यांना सुगंध, भडक कपडे असे काही चालत नाही. त्यांचे सांगणे आहे -१) **माणसाच्या पलीकडे जाऊन इतर जीवांचा विचार करा**. २) आपल्याला रोजच्या जगण्यासाठी **निसर्गाच्या विरोधात जावे लागते ते फार नको** ३) पारंपारिक ज्ञान मिळवू ४) माणसाच्या हातात पर्याय असतात निसर्गाच्या नाही हे लक्षात ठेऊन वागा. ५) चांगल्या अर्थाने जंगली बना.

**ज्येष्ठ गायिका –आरती अंकलीकर**

अनेकानेक पुरस्कार, सरदारी बेगम सारख्या निवडक चित्रपटांसाठी गायन, सवाई गंधर्व महोत्सवासारख्या अनेक प्रतिष्ठित संगीत महोत्सवांत सहभाग अशा आरती ताईंना गाण्याचं बाळकडूच मिळालं होतं.
चार पाच वर्षाच्या लहानग्या आरतीला झोपाळ्यावर बसवून आई गाणी म्हणत असे. तेव्हापासून ती लय (झोपाळ्याची) अंगात भिनली. काकडआरती, भजने काही ना काही गाणी सतत कानावर

पडत असत. शाळेत असताना तिसरीत आगाशे मास्तरांनी गाण्याच वेड व रियाजाची सवय लावली. सातव्या वर्षी पाच वर्षाची साधना (सरगम) खयाल म्हणताना बघून खरी जिद्द निर्माण झाली. आई अभ्यासासाठी मागे लागे तर वडील गाण्यासाठी. वडील मण्यांचा डबा घेऊन बसत व एक तान झाली की एक मणी बाजूला ठेवत. पुढे तर किशोरी आमोणकर या त्यांच्या गुरूंनी सांगितले की प्रत्येक जागा पाचशे वेळा घोटली पाहिजे. **सायास केल्याशिवाय विनासायास जमत नाही**. आजही त्यांचे वडील किती कार्यक्रम झाले ते विचारत नाहीत तर रियाज किती केला, काय नवीन शिकलीस असे विचारतात.

शास्त्रीय संगीत हे मनोरंजनासाठी नसून आत्मरंजनासाठी आहे. शब्दांना जितकं कमी महत्व तितक ते अभिजात संगीत. मिंडे मधे संगीत आहे ,स्वरस्थानात नाही. **रांगोळीच्या ठिपक्यात सौंदर्य नसतं ते जोडून काढलेल्या रांगोळीत आहे.** आवर्तन हे एखादं पेंटिंग किंवा चित्रपटाच्या कथेप्रमाणे आहे. माझ्या कुठल्या आवाजाने मला आनंद होतो आहे हे प्रथम शोधा व त्याप्रमाणे गा. **प्रत्येक शिष्याचं अंतरंग समजून घेऊन त्याप्रमाणे मी शिकवते त्यामुळे प्रत्येकाबरोबर मीही शिकत रहाते**.

**चतुरस्त्र अभिनेता - संजय नार्वेकर**

बालपण चाळीत गेले पण त्यानंतर कॉलेजचा जनरल सेक्रेटरी होणे, नाटकं बसवणे अशामुले आत्मविश्वास वाढत गेला. ते म्हणतात की मी नेहेमी चांगलच काम करीन, पण ते लोकांना आवडण/नावडण माझ्या हातात नाही.

'All the Best' नाटकात त्यांची बहिऱ्याची भूमिका होती तर 'अगं बाई अरेच्च्या' चित्रपटात अति ऐकू येणाऱ्याची होती. **भूमिकेचे अंतरंग समजून घेतले की बाहेरून भूमिका कशी करायची ते ठरवता येते.**

ते म्हणाले सतत माणसांचे निरीक्षण करणे हा नटाचा अभ्यास असतो. **नाटकाला आपण प्रयोग म्हणतो म्हणजे प्रत्येक वेळी शिकत असतो.** ते म्हणतात की स्वतः कडे प्रचंड उर्जा त्यांना प्रेक्षकांकडून मिळते.

**पहिल्या tablet शाळेचे डिजिटल सानेगुरुजी – संदीप गुंड.**

अहमदनगर मधील एका लहानशा गावात जन्मलेल्या संदीप गुंडचे शिक्षक होण्याचेच ध्येय होते. शिक्षण पूर्ण झाल्यावर शहापूर पासून ४० किमी. दूर, ठाणे जिल्ह्यातील पष्टेपाडा इथे शिक्षणसेवक म्हणून नोकरी मिळाली. गावापासून दोन किमी. वर गाडी रस्ता संपलेला पाहून तो तिथूनच परत फिरला. अधिकाऱ्यांना म्हणाला मला चांगलं काम करायचं आहे, चांगली शाळा द्या. सरांनी सांगितले चांगलं काम पष्टेपाड्यालाच कर.

नाईलाज झाल्यावर मन लावून कामाला सुरवात केली. चार महिन्यात बढती मिळून त्याला मुख्याध्यापक करण्यात आलं. शिक्षक, कारकून, शिपाई आणि मुख्याध्यापक सगळे काही तोच. मग त्याने ठरवले की पाहिलं काम म्हणजे समाजाला शाळेशी जोडणं.

लोकांसाठी पष्टेपाडा फेस्टिवल, हळदीकुंकू, मॅजीक शो असे अनेक उपक्रम केले. शाळेत फक्त पंचवीस मुलं होती आणि त्यातलीही निम्मी गायब असायची, काही फक्त खिचडीसाठी यायची. शिकण्यात कोणालाच रस नव्हता. गावात पाटलांकडे टीव्ही आल्यावर सगळी मुलं तिथेच डोळे खिळवून बसू लागली. यावरून गुंड सरांना कल्पना सुचली. त्यांनी शाळेतच टीव्ही आणला. आपोआप मुलं शाळेत आली.

गावातल्या प्रत्येकाला हे पटले की या जुनाट पडक्या शाळेमुळे मुलांना त्रास होईल ,म्हणून चांगल्या शाळेची गरज आहे. गावाने श्रमदानाने शाळा छान बांधून काढली. प्रत्येक घरटी कमीतकमी हजार रुपये वर्गणी काढली. ज्यांना जे काम येत होते ते त्यांनी केले. रंगाऱ्यांनी तर शाळा नुसती रंगवली नाही तर त्यावर चित्रही काढली. सरांनी डिजिटल स्कूलचे स्वप्न पाहिले तेव्हा तिथे वीजही नव्हती. पण ते म्हणतात जेवढ्या समस्या जास्त तेवढा कामाला वाव जास्त. पुण्यातल्या मेहता या मुलीने लग्नाचं रिसेप्शन साधं करून वाचलेल्या एक लाख रुपयातून सोलर किट बसवून दिले. अमरावतीच्या एका खासदाराने आपल्या वाढदिवसानिमित्त तिथे पंचवीस हजार रुपये देणगी दिली. डोंबिवलीतले एक गृहस्थ सरांचा मोबाईलचा दरमहा एक हजार रुपयांचा खर्च उचलतात. असे लोकांपर्यंत पोचता आले कारण आपल्या गावा पुरते मर्यादित न रहाता जगभर पोचण्यासाठी त्यांनी इंटरनेटचा आधार घेतला. त्यासाठी त्यांना गावापासून चाळीस किमी. दूर जावे लागे.

गुंड सरांना आधी कॉम्प्युटरचा फारसा गंधही नव्हता. पण शिक्षक प्रशिक्षणादरम्यान ते उत्कृष्ट powerpoint presentation करायला लागले. 'Google गुरु' कडून त्यांचे शिक्षण कायम चालूच असते. मुलांकडूनही सर शिकतात. एका मुलाकडून तर ते पियानोवर काही गाणी वाजवायलाही शिकले ! ते म्हणतात चांगलं जगायला , वागायला शिकवतं ते शिक्षण. सरांच्या प्रेरणेमुळे त्यांची पत्नी शाळेत नोकरीला नसूनही त्यांना कामात मदत करते.

आज अशा सहा हजार शाळा डिजिटल झाल्या आहेत. त्यात लोकसहभाग नव्वद कोटी रुपयांचा आहे.

**दहीहंडीच्या मनोऱ्याच्या वरचा हंडी फोडतो पण बरोबर खालचे सगळे असतात म्हणूनच ते शक्य होते.** अब्दुल कलामांच्या हातून मिळालेले बक्षीस आजही त्यांना प्रेरणा देत रहाते. म्हणून सरांना दहा वर्षानंतरही शिक्षकच रहायचे आहे.

तीन दिवस , साडेतीन हजार प्रेक्षकांच्या साक्षीने चाललेला वेध समारोह राष्ट्रगीताबरोबर संपन्न झाला ! आता वेध पुढल्या वर्षीच्या वेधचे !